# INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF MANAGEMENT SOCIOLOGY & HUMANITIES

ISSN 2277 – 9809 (online)
ISSN 2348 - 9359 (Print)

*An Internationally Indexed Peer Reviewed & Refereed Journal*

www.IRJMSH.com
www.isarasolutions.com

Published by iSaRa Solutions

# पानाफुलांची सजावट : एक पूजा

**प्रा.डॉ.सौ.अरुणा रविंद्र वाघोले.**

सहयोगी प्राध्यापक, इतिहासविभाग प्रमुख.

मा.बाळासाहेब जाधव क, वा,

वि.महाविदयालय

आळे, ता.जुन्नर. जि .पुणे.

४२२४११.

aruna.123w@gmail.com

**प्रास्ताविक** :

भाद्रपद महिना लागला की गौरी गणपतीचे आगमन होतेच. पेपरमध्ये नुकतेच याच काळातील विविध फुलांची माहिती देणारे सदर सुरू झाले. सकाळ वृत्तपत्र सतत वेगवेगळे उपक्रम राबवीत असते, त्यापैकीच फुल- फुलांची नावे, त्यांची महती रामायण- महाभारत प्राचीन काळ ते आजच्या काळातील फुलांचा प्रवास कसा झाला याबद्दल छान माहिती देतात. वनस्पतीशास्त्र विषयाचा तो अत्यंत महत्त्वाचा सौंदर्यवृद्धी करणारा, सुगंध देणारा, महत्त्व वाढवणारा, रोजगाराची नवनवीन संधी देणारा चिरंतन असा सुयोग्य मार्ग आहे. त्यासाठी निसर्गाकडे मागणी अर्ज करावा लागत नाही. पाण्याची सोय करावी लागत नाही, तसेच जमीन, माती, शेत, कामगार यांचा पुरवठाही लागत नाही, तर ती ऋतुमानानुसार निसर्गतः श्रावण, भाद्रपद, अश्विन, कार्तिक, मार्गशीर्ष या महिन्यात देवांना हवी असणारी पूजेसाठी पाने- फुले आपोआप मिळतात. फक्त माणसाने त्यांचा शोध घेणे, योग्य वापर करणे हे महत्त्वाचे आहे. ही नैसर्गिक देणगी मानवाने जतन केलीच पाहिजे. त्यावर संशोधन करून त्यांचा भावी पिढीसाठी वारसा जतन केला जाईल याबाबत मनापासून आवडीने अभ्यास करावा असे वाटते. यातूनच एका मुलाने / पुत्राने आपल्या वडिलांचा छंद आवड पूर्णत्वास नेण्यासाठी फुलांची सजावट कशी करावी यातून छंद जोपासला व तो नातवंडांनी कसा अंगीकारला ते समजून घेऊया.

**फुलांची सजावट:**

आईचे व वडिलांचे स्वप्न सत्यात उतरविणारा सुपुत्र आपण नेहमीच नवनवीन विचार करतो. कृती करतो. पण आपल्या आई-वडिलांनी केलेले कार्य पुढे त्यात आणखीन नवीन भव्यता निर्माण करण्याचा प्रयत्न केलेले फारच कमी पाहतो.

पुणे शहरात राहताना १०-१५ वर्षापासून आपल्या बागेत फुलझाडे लावणे, स्वतः पाणी घालणे, नवनवीन रोप आणणे या त्याच त्याच प्रकारात वडिलांचे आयुष्य गेले ते गेले आणि त्यानंतर तोच वारसा चालविण्याचा ध्यास एका सुपुत्राने हाती घेतला. त्याने आपल्या वडिलांच्या भाव भावनांना नवीन रूप देऊन ताजेतवाने करण्याचा प्रयत्न केला. त्याचे नाव पेशाने ते वकील आहेत. लोकांना समाजात न्याय देण्याचे काम करतात. ते त्यांनी प्रथमच आई आणि वडिलांच्या मनातील फुल झाडांना नवनवीन रूप कौशल्य वापरून हसती खेळती बाग निर्माण केली. जागा- माती- रोप- फुले- पाने- कुंडया वडिलांना न्याय दिला.

पेशा सांभाळताना त्यांनी एक माळी बाग कामासाठी ठेवला. अनेक नवनवीन रोप आणणे, ती लावणे, फुलांची-पानांची देखभाल करणे यातून छान छंद जोपासला. दररोज फुले, पान यातून रांगोळी काढून छान छान सजावटी केलेल्या आहेत. पुस्तक लिहिले आहे. आपला छंद जोपासला आहे.

जास्वंदी, कन्हेर, मोगरा, गुलबक्षी, गुलाब, गोकर्ण, चमेली, जास्वंदी, नाजूक कळीदार, लाल पांढरी, जाई -जुई, झेंडू, तगर, सोनटक्का

इ. फुले सकाळी आई तोडून आणते, आणि एका टेबलावर सर आणि नातवंड फुले, पाने गोळा केली की छान छान रांगोळी काढतात. मोरांचा आकार, १५ ऑगस्ट झेंडा, डोक्याचा टोप, जाळी, विविध आकाराच्या सजावट आपणास पहावयास मिळते. ही सजावट ते आपल्या मित्राला पाठवतात. ते मित्र विविध गटात गावातील मित्रांना पाठवतात.

मी असेच ही सजावट ग्रुपवर आली असता दोघा तिघांना विचारले आपणा घरी आहेत का ही फुले, आपण करतात का? काहीजण हो म्हणाले. मी नंतरही एक दोघांना विचारले ते हो म्हणाले.

नंतर एक दिवस महेंद्र 9881930541 यांना फोन केला, त्यांनी मला मित्रांचा पत्ता दिला. अशा रचना गेली तीन वर्ष माझ्या एका मित्राकडून येतात याची मी रिस्पेक्ट करतो. त्यांना म्हटलं अखेर जो हे काम करतो त्यालाच हे श्रेय व कौतुक केले पाहिजे. अभिनंदन -कौतुक कला विकसित करणारे कलाकार हे शिवाजीनगर न्यायालयातील माझे वकील मित्र अविनाश कुलकर्णी. रोज सकाळी ताजी फुले व पाने गोळा करून त्या रांगोळ्या बनवतात व मला छायाचित्र पाठवतात. श्रेय त्यांना द्या ऍडव्होकेट राजेंद्र ठाकूर देसाई यांनी हा मेसेज केला होता. सेनापती बापट रोडजवळ राहतात त्यांच्या घरी मी जाऊन ही बाग पाहणार आहे. जगात किती प्रकारचे लोक असतात, कोणाला काय काय छंद असतात हे मी हे समजते. माझी भेट मोबाईल वरून झाली तेव्हा त्यांनी अगदी मनसोक्त गप्पा मारल्या कस कसे काम केले हे सर्व सांगितले. त्यानंतर मी त्यांना म्हटले तुम्ही आता गणपती उत्सवात याचे फोटोग्राफीचे प्रदर्शन भरवा. याचा निश्चितच फायदा व समाधान मिळेल. फुलांचा सुगंध दरवळतो तसा आपल्या कलेचा प्रचार व प्रसार होईल. वकिली व्यवसायातून लोकांना न्याय देतात. तसेच फुलांच्या जगतात फुलांना सजवण्याचा बहर सजावटीतून आणतात. तसाच ही कला प्रदर्शनातूनच लोकांच्या मनामनात, नवोदितांना दिशा देण्यासाठी, कार्यप्रवृत्त व्हावे असे वाटते. हो म्हणाले पाहूया मग तो दिवस कसा केव्हा येतो ते.

**संदर्भ ग्रंथ व तळटीपा :**

१) दैनंदिन वृत्तपत्र सकाळ

२) दैनंदिन वृत्तपत्र लोकसत्ता

३) दैनंदिन वृत्तपत्र लोकमत

४) निसर्गनिर्मित फुले

५) स्वतः अंगणातील झाडांची पाने, फुले जमा करून केलेली सजावट

प्रा.डॉ.सौ.अरुणा रविंद्र वाघोले.


सहयोगी प्राध्यापक, इतिहासविभाग

प्रमुख.












श्री लक्ष्मीनारायण























































Text






ISARA INSTITUTE OF MANAGEMENT & PROFESSIONAL STUDIES




RSEARCH GATEWAY







AROGYAM ONLINE

PARIVARTAN PSYCHOLOGY CENTER






**भारतीय भाषा, शिक्षा, साहित्य एवं शोध**

**ISSN 2321 – 9726**

**WWW.BHARTIYASHODH.COM**

**INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF MANAGEMENT SCIENCE & TECHNOLOGY**

**ISSN – 2250 – 1959 (0) 2348 – 9367 (P)**

**WWW.IRJMST.COM**

**INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF COMMERCE, ARTS AND SCIENCE**

**ISSN 2319 – 9202**

**WWW.CASIRJ.COM**

**INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF MANAGEMENT SOCIOLOGY & HUMANITIES**

**ISSN 2277 – 9809 (0) 2348 - 9359 (P)**

**WWW.IRJMSH.COM**

**INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF SCIENCE ENGINEERING AND TECHNOLOGY**

**ISSN 2454-3195 (online)**

**WWW.RJSET.COM**

**INTEGRATED RESEARCH JOURNAL OF MANAGEMENT, SCIENCE AND INNOVATION**

**ISSN 2582-5445**

**WWW.IRJMSI.COM**

**JOURNAL OF LEGAL STUDIES,POLITICS AND ECONOMICS RESEARCH**

**WWW.JLPER.COM**